# ग्रंथप्रदर्शन

आज दिनांक ८.८.२०१४ रोजी आय. एम. आर मध्ये डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या जयंती निमित्त दि. ८ व ९ ऑ. रोजी ग्रंथ प्रदर्शन भरवण्यात आलेले आहे. सदर ग्रथ प्रदर्शनामध्ये आय. एम. आर लायब्ररीमधील १००० च्या वर कथा, कादंब—या, ललित कला साहित्य स्पर्धा परिक्षा, जनरल नॉलेज, प्रेरणादायी पुस्तके व प्रशांत बुक डेपोचे ग्रंथ विद्यार्थ्यांसाठी प्रदर्शित करण्यात आले.

आय. एम. आर चे ग्रंथप्रदर्शनाचे ७ वे वर्ष असून त्या निमित्ताने आय. एम. आर मध्ये विविध जेष्ठ विचारवंत, अभ्यासक, प्रकाशक यांनी मार्गदर्शन करुन गेले. जसे की प्रसिध्द उदयोजक श्री. विठ्ठल कामत, श्री अविनाश धर्माधिकारी, डॉ. टी. आर. बोरसे, डॉ. चिकाटे, डॉ. विनय पाटील, डॉ. शामकांत देशमुख, श्री. विजय कंची इ. जेष्ठ ग्रंथपाल आय. एम. आर मध्ये येउन गेलेले आहेत.

दिपप्रज्वलन प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. किसन पाटील, श्री. रंगराव पाटील, डॉ. विवेक काटदरे, श्री. ग्रंथपाल चंद्रशेखर वाणी व श्री. दिपक घुगे यांनी केले.

अशा या ग्रंथप्रदशनाच्या निमित्ताने प्रा. डॉ. किसन पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले कि, तुम्ही आज ग्रंथ वाचाल तर उद्या वाचणार तसेच बरेचशे मराठी वाडंमयीन पुस्कांचा दाखला दिला. त्यामध्ये मराठी भाषा ही इंग्रजी भाषे पेक्षा किती प्रगल्भ आहे हे निरनिराळया उदाहरणावरुन स्पष्ट केले. तसेच मराठी भाषेमध्ये पाण्याचे मडके या शब्दासाठी ५५ समानार्थी शब्द आहेत, हे पटवून दिले. तसेच हल्लीची मुले वाचन करत नाहीत. त्यामुळे त्यांना मानसिक ताणतणावाचा सामना करावा लागतो व हे विद्यार्थी त्यामुळे आत्महत्या देखिल करु शकतात. त्यामुळे ग्रंथ वाचने हे किती उपयोगाचे आहे. याचे महत्व पटवून दिले.

तसेच त्यांनी वर्षभरात जास्त पुस्तके वाचणा—या विद्यार्थ्यास १०१ रु. भेट देणार आहे. संस्थेचे संचालक डॉ. विवेक काटदरे सर यांनी सांगितले की, पुस्तकांमुळे विद्यार्थ्यांच्या आयुष्यात चांगले संस्कार रुजविले जाते, त्यांच्या ज्ञानात भर पडते. त्यांनी संदर्भ पुस्तके व्यतिरिक्त सुद्धा निरनिराळे वर्षभरात कमीत कमी २० पुस्तके वाचावित असे सांगितले.

या प्रसंगी MBA चे विद्यार्थी निलेश शिंदे व अश्विनी जगताप यांना प्रा. बीजे लाठी व सौ. डॉ. शुभदा कुलकर्णी मॅडम यांनी जास्त पुस्तके वाचली म्हणुन पुस्तके भेट दिली. तसेच BBS ची विद्यार्थीनी श्रृती चौधरी व रुपेश पाटील या विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. शमा सराफ व प्रा. डॉ. योगेश महाजन यांनी सुध्दा पुस्तके भेट दिलीत.

दि. ९ रोजी सकाळी १० वा. प्रा. डॉ. शशांक सोनवणे बाबा साहेब आंबेडकर विद्यापीठ औरंगाबाद हे E – Resources हया विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहे.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. योगेश पाटील यांनी केले. प्रास्ताविक ग्रंथपाल श्री. चंद्रशेखर वाणी व आभार प्रदर्शन ग्रंथपाल श्री. दिपक घुगे यांनी केले.